# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका , भिवंडी

## जनसंपर्क विभाग

आदेश

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी-(ठाणे)

जा.क्र. भि.नि.श.म/जनसंपर्क/११३९
दिनांक १८-११-२०२०

**विषय : महापालिका क्षेत्रातील कंटेनमेंट झोन व्यतिरिक्त अन्य ठिकाणी असणारी धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे सुरु करण्याबाबत.**

**संदर्भ :-१) साथरोग प्रतिबंधक अधिनियमन १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५**
**३) शासन अधिसुचना सारवजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १३ मार्च २०२०**
**४) महाराष्ट्र शासन अधिसचूना गृह विभागाकडील परिपत्रक क्र.आर.एल,पी ११२०. प्र.क्र/१८० /विशा १ ब, दि. ५ नोव्हेंबर २०२०**
**५) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, आपत्कालीन व्यवस्थापन विभाग डीएमयू/२०२० सी..आर.९२/एम.१ दिनांक १४ नोव्हेंबर चा आदेश**

ज्याअर्थी शासनाच्या उपरोक्त संदर्भिय क्र. ३ च्या शासन आदेशानुसार राज्यातील सर्व काणी विविध बाबी सुरु करण्याबाबत आदेश प्राप्त झाला असुन, सदर आदेशास अनुसरुन भिवंडी महापालिकेकडील विविध आदेशान्वये, महापालिका क्षेत्रात अनेक बाबी सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे,

ज्याअर्थी, उपरोक्त् संदर्भ क्र. ५ च्या शासन आदेशान्वये दि. १४ ऑक्टोबर, २०२० च्या शासन आदेशामधील खालीलप्रमाणे अतिरिक्त मुद्दे नमुद करुन कंटेनमेंट झोनचे योग्य प्रकारे नियोजन करुन, कोविड-१९ चा प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करुन राज्यातील सर्व धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे , मंदिरे खालील अटी व शर्तीवर सुरु करण्याबाबत आदेश प्राप्त झाला आहे,

त्याअर्थी, महापालिका क्षेत्रातील कंटेनमेंट झोनचे याव्यतिरिक्त् अन्य भागातील सर्व धार्मिक स्थळे, प्रार्थना स्थळे, दि. १८ नोव्हेंबर, २०२० पासुन धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनाकडून ठरविण्यात येणाऱ्या वेळेमध्ये सुरु करण्यास खालील अटी व शर्तीवर या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

धार्मिक स्थळी प्रवेश करताना मास्कचा वापर, भौतीक अंतर (PHYSICAL DISTANCING), निर्जंतुकीकरण आणि हात धुण्यासाठी सुविधा या सर्व बाबी अनिवार्य आहेत. याबाबत कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त काळजी घेण्यात यावी. धार्मिक स्थळी / प्रार्थना स्थळी मोठया प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. यामुळे कोविड-१९ चा संसर्ग रोखण्यासाठी भौतीक अंतर (PHYSICAL DISTANCING) आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

1) **व्याप्ती :**

यापूर्वीच्या कोविड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनासंह या अतिरिक्त सूचना असतील. त्यामुळे यापूर्वीच्या सर्व सुचनांचे पालन करण्यात यावे. कंटेनमेंट झोन मधील धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे ही

बंद रहातील.  फक्त् कंटेनमेंट झोन व्यतिरिक्त् अन्य ठिकाणी धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे सुरु करण्यास याद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

2) **प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

वय वर्षे ६५ वर्षावरील व्यक्ती, गंभीर आजार असणाऱ्या व्यक्ती, गरोदर महिला, १० वर्षांखालील मुले यांनी घरी राहण्याबाबतचा सल्ला देण्यात येत आहे. धार्मिक संस्था व्यवस्थापनकडून याबाबतचा सल्ला देण्यात यावा.   कोविड-१९ चा प्रतिबंधासाठी धार्मिक स्थळी खालील बाबींचे पालन करण्यात यावे.

१) सार्वजनिक स्थळी परस्परामध्ये ६ फुटांचे अंतर राखण्यात यावे.
२) मास्क आणि फेसकव्हरचा वापर अनिवार्य.
३) साबणाचा वापर करुन किमान ४० ते ६० सेकंदापर्यत स्वच्छ हात धुण्यात यावेत. शक्य असले तेथे सॅनिटायझरचा वापर २० सेकंदापर्यंत करण्यात यावा.
४) खोकला किंवा शिंकताना रुमाल किंवा टिश्यु पेपरचा वापरचा करण्यात यावा.  तसेच वापर करण्यात आलेल्या टिश्युची योग्य विल्हेवाट करण्याची व्यवस्था सबधित धार्मिक संस्थाची व्यवस्थापन यानी योग्य प्रकारे करण्यात यावी.
५) आजाराची कोणतीही लक्षणे असल्यास त्याबाबत तात्काळ वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन घ्यावी.
६) थुंकण्यास सक्त मनाई आहे.  अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
७) आरोग्य सेतु ॲपचा वापर सर्वांनी करण्यात यावा.

3) सर्व प्रकारच्या **धार्मिक स्थळे/प्रार्थना स्थळे यांनी** खालील **खबरदारी** घेणे बंधनकारक असेल **:**

1. प्रवेशाचे वेळी थर्मल स्क्रिनींग आणि सॅनिटायझर उपलब्ध करुन देण्यात यावा.
2. कोविड-१९ सदृश्य आजाराची लक्षणे नसणाऱ्या व्यक्तींनाचा (ASYMPTOMATIC PERSONS) प्रवेश देण्यात येईल.
3. मास्क किंवा फेस कव्हर असणाऱ्यांनाच प्रवेश देण्यात येईल.
4. प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबतचे फलक दर्शनी भागात लावण्यात यावेत.  तसेच याबाबत ऑडीओ / व्हिडीओद्वारे जनजागृती करण्यात यावी.
5. सबधित धार्मिक स्थळे यांनी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन प्रवेशासाठी वेळ निश्चित करुन (TIME SLOTS) निश्चित करुन त्याची जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यात यावी धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे यांची मर्यादा विचारात घेऊन प्रवेश करणाऱ्यांसाठी वेळा आणि संख्या ही व्यवस्थापनाकडून निश्चित करण्यात याव्यात.
6. प्रवेश करणाऱ्याच्या चप्पल / बुट हे स्वत:च्या वाहनांमध्येच ठेवण्यात यावेत.  आणि बाहेर ठेवयाचे झाल्यास स्वत:च आपल्या कुटूंबाचे चप्पल बुट बाहेर ठेवावे.
7. भौतीक अंतर (PHYSICAL DISTANCING) योग्य प्रकारे पालन करुन गर्दीचे/PARKING इत्यादी नियोजन करण्यात यावे.
8. धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळांच्या आतील किंवा बाहेरील भागातील दुकाने किंवा कॅफेट एरियामध्ये त्रिसुत्र (नियमीत मास्कचा वापर, नियमीत हात धुणे, (साबण किंवा सॅनिटायझर), भौतीक अंतर (PHYSICAL DISTANCING) (६ फ़ुट अंतर) याचे पालन करण्यात यावे.
9. प्रवेशासाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये पुरेसे अंतर राखुन मार्गीका (FLOOR MARKING) आखण्यात यावी.
10. प्रवेशासाठी आणि बाहेर पडण्यासाठी वेगवेगळे मार्ग निश्चित करण्यात यावेत.
11. प्रवेशाचे वेळी प्रत्येक व्यक्तींमध्ये ६ फुटाचे अंतर राहील याबाबत नियोजन करण्याची जबाबदारी धार्मिक स्थळ व्यवस्थापनावर राहील.
12. प्रवेश करण्यापूर्वी हात व पाय साबणाने स्वच्छ धुवावेत.

13. भौतीक अंतरचे (PHYSICAL DISTANCING) पालन करुन बसण्याची व्यवस्था करण्यात यावी. ज्या ठिकाणी ए.सी आहे त्यांनी तापमान 24 ते 30 अं.से. यामध्ये ठेवण्यात यावे. तसेच आर्दतेचे प्रमाण 40 ते 70% ठेवण्यात यावे मोकळी हवा खेळती राहील यासाठी नियोजन करण्यात यावे.
14. पुतळे / मूर्ती / पवित्र पुस्तके इत्यादिंना स्पर्श करण्यास परवानगी नसेल.
15. मोठ्या संख्येने जमाण्यास यापुढेही प्रबंध राहील.
16. कोविड-19 च्या संक्रमणाचा प्रसाराचा धोका लक्षात घेता, शक्य तितक्या रेकॉर्डेड भक्ती संगीत / गाणी वाजविली जाऊ शकतात.गायक-गायिका किंवा गायन गटांना, भजन व किर्तन इत्यादी परवानगी दिली जाऊ नये.
17. एकमेकांना अभिवादन करताना शारीरिक संपर्क टाळा.
18. सामान्य प्रार्थना मॅटचा वापर टाळावा आणि भक्तांनी प्रार्थनेसाठी स्वतःची चटई किंवा कपडा आपल्याबरोबर आणावा.
19. धार्मिक स्थळाच्या आत प्रसाद / वितरण किंवा पवित्र पाणी शिंपडणे इत्यादी कोणत्याही बाबींना परवानगी नाही.
20. धार्मिक स्थळांवरील सामुदायिक किचन्स / लंगर "अन्न-दान " करताना भौतीक अंतरचे (PHYSICAL DISTANCING) पालन केले पाहिजे.
21. परिसरातील प्रभावी स्वच्छता राखणे. शौचालये, हात आणि पाय धुण्याचे ठिकाण/ क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे.
22. धार्मिक स्थळाच्या व्यवस्थापनाद्वारे वारंवार साफसफाई आणि निर्जंतुकीकरण करणे अनिवार्य राहिल
23. धार्मिक स्थळांच्या आवराचे वारंवार सफाई करण्यात यावी अनिवार्य राहिल.
24. अभ्यंगत आणि / कर्मचा-यांनी वापरलेल्या फेस कव्हर / मास्क / ग्लोव्हजची/ (TISSUE PAPER) ची योग्य विल्हेवाट लावण्यात यावी. सबधित धार्मिक स्थळाचे व्यवस्थापन या बाबत काळजी घेणे आवशक आहे.
25. धार्मिक ठिकाणी काम करणा-या सर्व कामगार आणि कर्मचा-यांना कोविड -19 च्या सुरक्षीततेबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे तसेच गर्दीच्या ठिकाणी काम करणा-या सर्व कामगारांची प्रत्येक आठवड्याला कोविड चाचणी करण्यात यावी.
26. शौचालय आणि खाण्याच्या ठिकाणी गर्दी नियंत्रण आवश्यक आहे.
27. पोलिस आणि जिल्हाधिकारी यांच्या नियमांचे सर्व धार्मिक स्थळांनी पालन करण्यात यावे. या बाबत (UNDER TAKING ) लेखी हमीपत्र संबधीत प्रार्थना व धार्मिक स्थळे यांनी द्यावी.
28. धार्मिक स्थळांच्या आवारात संशयित रूग्ण आढळल्यास:
    a. आजारी व्यक्तीला एखाद्या खोलीत किंवा क्षेत्रामध्ये ठेवा जेथे ते इतरांपासून दूर आहेत.
    b. डॉक्टरांनी तपासणी करेपर्यंत फेसकवर किंवा मास्क देण्यात यावा.
    c. जवळच्या वैद्यकीय सुविधा (रुग्णालय / क्लिनिक) त्वरित कळविण्यात यावे किंवा राज्य किंवा जिल्हा हेल्पलाईनवर संपर्क साधण्यात यावा.
    d. अशा परिस्थितीत शासनाच्या वैद्यकीय टिममार्फत त्या परिस्थितीची हाताळणी करून पुढील निर्णय घेण्यात येईल.
    e. सदर व्यक्ती कोविड पॉझीटिव्ह आढळल्यास संपुर्ण परिसराचे निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
29. सर्व धार्मिक स्थळ मध्ये त्रिसुत्री (नियमीत मास्कचा वापर, नियमीत हात धुणे, (साबण किंवा सॅनिटायझर) नियमित भौतीक अंतर (PHYSICAL DISTANCING) (६ फ़ुट) राखणे याचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सदर आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध केल्यास संबंधीतांचे विरुध्द यथास्थित आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी यापूर्वी असलेल्या सर्व उपाययोजना व मार्गदर्शक सूचनांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

१७/०७/२०२०

**( डॉ. मंताडा राजा दयनिधी )**
**आयुक्त** (भा. प्र. से)
**भिंवडी नि. शहर महानगरपालिका**

**प्रत** : 1 ) मा . मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव .
2 ) मा . पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव ,
3 ) मा . मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी
4 ) मा . विभागीय आयुक्त , कोकण 5 ) मा . पोलिस आयुक्त , ठाणे
6 ) जिल्हाधिकारी ठाणे . 7 ) पोलिस अधिक्षक ठाणे ( ग्रामीण )
8 ) मा . महापौर , मा . उप महापौर , मा . सभापती - स्थायी समिती , मा . सभागृह नेता , मा.विरोधी पक्ष नेता , सर्व गटनेते
9 ) स्विय सहाय्यक , मा.आयुक्त व अतिरिक्त आयुक्त -1 व 2 यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी .
10 ) उपआयुक्त ( मुख्यालय ) , पोलिस उप-आयुक्त, परिमंडळ — २ भिवंडी. सर्व उपआयुक्त - परिमंडळ यांजकडे माहितीसाठी ,
11 ) सर्व सहाय्यक आयुक्त / सर्व विभागप्रमुख , समन्वय अधिकारी - नागरी सुविधा केंद्र ,
12 ) मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये , सिस्टीम मॅनेजर , संगणक विभाग यांजकडे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
13) जनसंपर्क अधिकारी महानगरपालिका यानी उचित माध्यमाद्वारे हे आदेश जास्तीत जास्त नागरिकामध्ये प्रसिध्द करावी.